03-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02-06-2025 23:02 Page 1



भूस्खलनात ३ सैनिकांचा मृत्यू : ६ बेपता पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



पंजाब ११ वर्षांनंतर आयपीएल फायनलमध्ये पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, ३ जून २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 271 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 3 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# मंत्री गावडेंचा निर्णय दिल्ली दरबारी !

## भाजप प्रदेशाध्यक्षांनी ऐकून घेतली गावडे यांची बाजू | कारवाईचा विषय पक्षाच्या उच्चायुक्तांकडे

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २ : मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या आदिवासी कल्याण खात्यावर सार्वजनिक मेळाव्यात टीकेची झोड उठवणारे सरकारमधलेच मंत्री गोविंद गावडे यांच्यावर कारवाई करायची की नाही याचा निर्णय राज्य भाजपच्या हाती राहिला नसून याबाबतचा निर्णय आता भाजपचे दिल्लीचे नेते घेणार आहेत. गावडे यांच्या प्रेरणा दिन मेळाव्यानंतत त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे खुद्द मुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी जाहीर केले होते. मात्र आता हा निर्णय राज्य भाजपाऐवजी दिल्ली भाजपा घेणार आहे.**



आदिवासी कल्याण विभागात भ्रष्टाचाराच्या आरोपांवर टीका केल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या राज्य शाखेने कला आणि संस्कृतीमंत्री गोविंद गावडे यांच्यावर संभाव्य कारवाईचा विषय पक्षाच्या उच्चायुक्तांकडे पाठवण्याचा निर्णय सोमवारी घेतला.

भाजप प्रदेशाध्यक्ष दामोदर नाईक यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, त्यांनी गावडे यांची भूमिका ऐकण्यासाठी बैठक घेतली. त्यांचा अहवाल दिल्ली येथील पक्षाच्या उच्चायुक्तांकडे पाठवण्यात आला आहे. पुढील कारवाईसंदर्भात निर्णय तेच घेतील, असे नाईक यांनी स्पष्ट केले.

आज आम्ही गावडे यांची भेट घेतली, त्यांनी आपली बाजू मांडली. मी त्यांना पक्षाच्या शिस्तीबाबत समजावले. पुढील निर्णय पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून घेतला जाईल, असे नाईक म्हणाले.

दुसरीकडे, गोविंद गावडे यांनी याबाबत अधिक माहिती देण्यास टाळाटाळ केली. मी पक्षाच्या दक्षिण गोवा जिल्हा कार्यालयात मडगाव येथे दामू नाईक यांची भेट घेतली. सर्व मुद्दे मांडले असून त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची मी उत्तरे दिली, असे गावडे यांनी सांगितले.

नाईक यांनी त्यांच्या नुकत्याच झालेल्या दिल्ली दौर्यादरम्यान या प्रकरणावर कोणतीही चर्चा झाली नाही, असेही नमूद केले. मी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ११ वर्ष पूर्ण झाल्याच्या कार्यक्रमाच्या बैठकीसाठी दिल्लीला गेलो होतो. त्यावेळी या विषयावर चर्चा झाली नाही, असे त्यांनी सांगितले.

पूर्वी देखील दामोदर नाईक यांनी गावडे यांच्यावर अनुशासनहीनतेबाबत कठोर कारवाईचा इशारा दिला होता. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की पक्षामध्ये अनुशासन भंग सहन केला जाणार नाही. मंत्रिमंडळ फेरबदलाचा निर्णय मुख्यमंत्र्यांचा अधिकार असून त्यावर पक्षाचा हस्तक्षेप होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गोविंद गावडे यांनी २५ मे रोजी फोंडा येथे प्रेरणा दिन' कार्यक्रमात आदिवासी कल्याण विभागात भ्रष्टाचाराचा आरोप केला होता. त्यांनी सांगितले होते की, आदिवासी समाजाला दिलेल्या आश्वासनांनुसार विशेषतः पर्वरी येथील आदिवासी भवनाचे बांधकाम अद्याप सुरू झालं नाही. प्रशासनाचा ढासळलेला प्रकार असून, श्रम शक्ती भवनातील कंत्राटदारांकडून अनियमित व्यवहार होत आहेत, असे गावडे म्हणाले होते.यावर मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी प्रतिक्रिया देत सांगितले होते की, सरकारने या आरोपांची गंभीर दखल घेतली आहे आणि दोषींविरोधात योग्य ती कारवाई केली जाईल. परंतु मंत्र्यांनी जबाबदारीने वागावे आणि बेजबाबदार विधानं करू नयेत, असेही मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले होते.

# आयपीएल अंतिम फेरी : नव्या विजेत्याच्या शोधात अंतिम लढत



**अहमदाबाद, दि. २ :**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ अंतिम सामन्यासाठी चुरस वाढली आहे. ३ जून रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्स आमनेसामने येणार असून, यंदा लीगला नवा विजेता लाभणार याचे निश्चित संकेत मिळाले आहेत.

२९ मे रोजी चंदीगडच्या मुल्लानपूर मैदानावर झालेल्या सामन्यात बंगळुरूने पंजाब किंग्सचा ८ गडी राखून पराभव केला. त्या रात्री मैदानावर दोन लक्षवेधी घडामोडी घडल्या. बंगळुरूचा ज्येष्ठ फलंदाज विराट कोहलीने स्टँडमध्ये उपस्थित असलेल्या पत्नी अनुष्का शर्माकडे पाहत हातवारे करत 'एक सामना अजून बाकी आहे' असे सुचवले. दुसरीकडे, पराभवाचा स्वीकार करताना पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यर म्हणाला, लढाई हरलो, पण युद्ध अजून संपलेलं नाही.

अय्यरने आपला शब्द खरा ठरवत क्वालिफायर-२ मध्ये बलाढ्य मुंबई इंडियन्सवर विजय मिळवत पंजाबला अंतिम फेरीत पोहोचवले. गेल्या वर्षी कोलकाता नाईट रायडर्सला विजेतेपद मिळवून दिल्यानंतर अय्यरने यंदा नव्या संघाबरोबर पुन्हा एकदा अंतिम फेरी गाठण्याची कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, पंजाब किंग्सने आजवर एकदाही आयपीएलचे विजेतेपद मिळवलेले नाही.

विराट कोहलीने आयपीएलमध्ये १८ नंबरची जर्सी घालून १८ वर्षांचा प्रदीर्घ प्रवास केला आहे. मात्र, या कालखंडात एकदाही विजेतेपदाची चव त्याने चाखलेली नाही. यंदाच्या मोसमात बंगळुरूने रजत पाटीदारच्या नेतृत्वात आणि कोहलीच्या अनुभवाच्या साथीने अंतिम फेरी गाठली आहे. पहिल्या क्वालिफायरमध्ये पान २ ▶

## निवडक

### रशिया युक्रेनवर पलटवार करण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली, दि. २ :** रशिया-युक्रेन युद्ध अतिशय धोकादायक वळणावर येऊन पोहोचले आहे. गेल्या तीन वर्षांपासून दोन्ही देशांमध्ये संघर्ष सुरु आहे. आता युक्रेनने रशियाच्या ५ हवाई तळांवर ड्रोन हल्ले करत तब्बल ४० हून अधिक लढाऊ विमाने बेचिराख केली आहे. रशियन अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांच्या नेतृत्त्वाची शैली पाहता युक्रेनला लवकरच तिखट प्रत्युत्तर दिलं जाऊ शकतं. त्यामुळे परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली आहे. या सगळ्या परिस्थितीत भारताची चिंता वाढली आहे.

जगातील अर्थव्यवस्थांचा विचार करता भारताची प्रगती वेगाने सुरू आहे. रशियाने युक्रेनवर प्रतिहल्ला केल्यास भारताच्या अडचणी वाढू शकतात. भारताच्या प्रगतीला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. रशियानं युक्रेनवर पलटवार केल्यास त्याचा परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होईल. या बाजारात अस्थिरता निर्माण होईल. रशियाकडून भारत खनिज तेल खरेदी करतो. तेलासाठी भारत परावलंबी आहे. त्यामुळे भारताला खनिज तेलाची आयात करावी लागते. खनिज तेलाच्या बाजारात अस्थिरता निर्माण झाल्यास दरांमध्ये वाढ होईल. त्यामुळे आयातीवरील खर्च वाढेल. याचा परिणाम म्हणजे महागाई वाढेल.

---

### हवाई तळांवर ड्रोन हल्ले; ४१ विमाने बेचिराख

**मॉस्को, दि. २ :** युक्रेनने रशियाच्या हवाई तळांवर ड्रोन हल्ले करत तब्बल ४१ लढाऊ विमानं बेचिराख केली. रशिया-युक्रेन संघर्ष सुरु झाल्यापासूनचा हा सर्वात घातक हल्ला आहे. युद्ध क्षेत्रापासून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या रशियाच्या हवाई तळांना लक्ष्य करण्यासाठी युक्रेननं स्वस्त अशा ऋझत ड्रोन्सचा वापर केला. या स्वस्त ड्रोन्सनी रशियाची महागडी विमानं नष्ट केली. युक्रेननं ऑपरेशन स्पायडरवेबसाठी केलेला खर्च आणि त्यातून रशियाचं झालेलं नुकसान यांच्यात प्रचंड मोठा फरक आहे. याबद्दलची आकडेवारी डोळे विस्फारायला लावणारी आहे.

ड्रोन आणि शस्त्रं- एसबीयू एजंट्सनी १५० लहान एफपीव्ही ड्रोन आणि दारुगोळा सीमा पार करुन रशियात पोहोचवला. ड्रोनद्वारे हल्ला- ११६ ड्रोननं उड्डाण करुन रशियाच्या ४ हवाई तळांवर हल्ले चढवले. रणनीती- रशियन दूरसंचार नेटवर्कचा वापर करुन ड्रोन कंट्रोल करण्यात आले. यामध्ये ऑटो-होमिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे लक्ष्य निश्चित करण्यात आली. हल्ल्याची वेळ आणि पद्धत- दिवसा कमी अंतरावरुन हल्ला करण्यासाठी ट्रक्सवर लाकडी ढाच्यांमधून लॉन्च करण्यात आले.

---

### देशात कोरोनामुळे २४ तासांत ६ मृत्यू

**नवी दिल्ली, दि. २ :** देशात कोरोना व्हायरसने पुन्हा एकदा हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. आरोग्य विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशात कोव्हिड-१९ चे सक्रिय रुग्णांची संख्या २७१० वर पोहोचली आहे. यामध्ये केरळ, महाराष्ट्र आणि दिल्लीत रुग्णांची संख्या वाढली आहे. केरळमध्ये ११४७ कोरोना रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. तर महाराष्ट्रात ४२४ कोरोना रुग्ण आढळले आहेत. ३० मे सकाळी आठ वाजेपर्यंतच्या रिपोर्टनुसार, दिल्लीत २९४ आणि गुजरातमध्ये २२३ रुग्ण आढळले आहेत. कर्नाटक आणि तामिळनाडूत १४८-१४८ रुग्णांची नोंद झाली आहे. तर पश्चिम बंगालमध्ये ११६ रुग्ण आढळले आहेत. मागील २४ तासात ७ जणांचा मृत्यूही झाला आहे. तर दिल्ली, गुजरात, कर्नाटक, पंजाब आणि तामिळनाडूत एका कोरोना रुग्णाचा मृत्यू झालाय. दिल्लीत ६० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय राजधानीमध्ये २४ तासात ७७ रुग्णांची नोंद झाली. त्यानंतर केरळमध्ये २४ तासात ७२ आणि महाराष्ट्रात नव्या ३४ रुग्णांची नोंद करण्यात आलीय. मागील आठवड्यात (२५ मे पर्यंत) कोव्हिड रुग्णांमध्ये पाच टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर आले होते.

# मोन्सेरात यांच्या विधानाला रेंट-ए-कार वाल्यांकडून तीव्र विरोध

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**कळंगुट, दि. २ :** महसूल मंत्री मोन्सेरात हे टॅक्सी व्यावसाईकांमध्ये फूट पाडण्याचा डाव आखत असून हा डाव आम्ही कदापीही यशस्वी होऊ देणार नाही, असे उत्तर गोवा रेंट-ए-कॅब असोसिएशनने स्पष्ट केले आहे.

मंत्री मोन्सेरात यांनी रेंट-ए-कॅब आणि रेंट-ए-बाईक सेवा बंद करण्याची सूचना केल्यावर उत्तर गोवा रेंट-ए-कॅब असोसिएशनने सोमवारी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पर्यटक टॅक्सी व्यवसायात हस्तक्षेप करण्याचा मोन्सेरात यांचा प्रयत्न असला तरी रेंट-ए-कॅब आणि बाईक ऑपरेटरांनी तो स्पष्टपणे फेटाळला आहे.

मोन्सेरात यांचे विधान आम्हाला टॅक्सी चालकांपासून दूर ठेवण्याचा

**▶ व्यवसायात हस्तक्षेप करू नका : असोसिएशनचा इशारा**

आणि समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न आहे, असे मत असोसिएशनचे उपाध्यक्ष नितेश चोडणकर यांनी पत्रकार परिषदेत मांडले. टॅक्सी मालक, रेंट-ए-बाईक, रेंट-ए-कार चालक, शॅक मालक - आम्ही सर्वजण एकत्र आहोत. 'फूट पाडा आणि राज्य करा' ही रणनीती इथे चालणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

चोडणकर यांनी सांगितले की, अनेक रेंट-ए-कॅब चालकांचे कुटुंब सदस्य हेच शॅक चालवतात किंवा पर्यटक टॅक्सी चालवतात. त्यामुळे दोघांमध्ये वैर किंवा स्पर्धा असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. उलट, सरकारच बाहेरील कॅब ॲग्रीगेटर्सना राज्यात आणून स्थानिक टॅक्सी चालकांवर अन्याय करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

आम्ही हा व्यवसाय कायदेशीर मार्गाने सुरू केला आहे. त्यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. मोन्सेरात किंवा इतर कोणत्याही नेत्याने आम्हाला ही संधी दिली नाही. मग आमच्या व्यवसायात हस्तक्षेप करण्याचा त्यांना अधिकार कसा ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

मोन्सेरात यांनी वेळोवेळी कॅसिनो हटवण्याचे आश्वासन दिले आहे, याची आठवण करून देताना असोसिएशनच्या सदस्यांनी म्हटले, आम्हाला रोखण्याऐवजी त्यांनी आधी कॅसिनोंवर कारवाई करून दाखववी. आम्ही लहान व्यावसायिक आहोत. आमच्याकडे कोट्यवधींचे व्यवहार नाहीत. आम्ही रस्त्यावर उभे राहून कष्टाने पैसे कमावतो.

असोसिएशनने असा इशाराही दिला की, जर सरकारने मोन्सेरात यांचे वक्तव्य गांभीर्याने घेतले आणि त्यांच्या मागणीनुसार कारवाई केली, तर गोव्यातील पर्यटन व्यवसायावर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. पर्यटकांना पर्यायी वाहतूक पर्याय हवे असतात. रेंट-ए-बाईक आणि कॅब सेवा ही गरज बनली आहे, ती थांबवणे म्हणजे पर्यटकांची अडवणूक होईल, असे मत काही सदस्यांनी व्यक्त केले. गोव्यातील पर्यटनव्यवसाय आधीच अनेक अडचणींना सामोरे जात असताना, स्थानिकांनी उभ्या केलेल्या या सेवांवर बंधने घालणे चुकीचे आहे, असा सूर रेंट-ए-कॅब असोसिएशनच्या बैठकीत उमटला.

# दिव्यांगांसाठी कायमस्वरूपी वसतिगृहे उभारणार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २ :** येत्या चार ते पाच वर्षांत गोव्यातील दोन्ही जिल्ह्यांमध्ये दिव्यांग नागरिकांसाठी स्थायी स्वरूपाची वसतिगृहे उभारण्याचा राज्य सरकारचा मानस बाळगत आहे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी जाहीर केले आहे. दिव्यांगांच्या जीवनातील सुरक्षिततेसाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सावंत हे साखळी येथील रवींद्र भवन येथे पार पडलेल्या एडीआयपी मूल्यांकन शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते. या शिबिरामध्ये राज्यातील पात्र दिव्यांग नागरिकांना विविध सहाय्यक साहित्य व उपकरणांचे मोफत वितरण करण्यात आले.

या उपक्रमाच्या माध्यमातून दिव्यांगांच्या पालकांना त्यांच्या मृत्यूनंतर मुलांच्या भवितव्याची चिंता वाटू नये, याची काळजी घेण्यात येत आहे. सरकारकडून दिव्यांग बांधवांसाठी आधारभूत संरचना उभी करण्याचे हे पाऊल आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

कार्यक्रमाला समाजकल्याण मंत्री सुभाष फलदेसाई, दिव्यांग व्यक्ती आयुक्त गुरुप्रसाद पावसकर, नियोजन, सांख्यिकी व मूल्यांकन संचालक विजय सक्सेना, राज्य आयुक्त ताहा हाझिक आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, राज्यातील सर्व १२ तालुक्यांमध्ये राबवलेला हा उपक्रम म्हणजे सर्व नागरिकांमध्ये विशेषतः दिव्यांग बांधवांमध्ये समावेशकता आणि प्रतिष्ठा वाढवण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा एक ठोस पुरावा आहे.

गोवा सरकारच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाने राज्य दिव्यांग व्यक्ती आयुक्त कार्यालय, नियोजन, सांख्यिकी व मूल्यांकन संचालनालय यांच्या सहकार्याने आणि भारत सरकारच्या अलीमको या उपक्रमाच्या माध्यमातून २० मे ते २ जून दरम्यान राज्यभरात मूल्यांकन शिबिरे आयोजित केली होती.

'स्वयंपूर्ण गोवा २.०' व 'समावेशक गोवा' या उपक्रमांचा भाग म्हणून राबविण्यात आलेल्या या शिबिरांचे प्रमुख उद्दिष्ट दिव्यांग व्यक्तींना एडीआयपी योजनेअंतर्गत सहाय्यक उपकरणे मोफत वितरित करणे व त्यासाठी पात्र लाभार्थ्यांची ओळख पटविणे हे होते.

# रेंट-ए-कार, रेंट-ए-बाईकवर बंदी घाला-मोन्सेरात यांचा हल्लाबोल

## टॅक्सी संघटनांची वाहतूक संचालनालयावर धडक | ॲग्रीगेटर धोरणाला तीव्र विरोध

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २ :** राज्यातील रेट-ए-कार आणि रेंट-ए-बाईक व्यवसायावर नियंत्रण नसल्याने वाहतूक खात्याची तीव्र शब्दांत कानउघाडणी करत महसूलमंत्री बाबूश मोन्सेरात यांनी या व्यवसायावर बंदी घालण्याची मागणी केली. या वाहनांनी सार्वजनिक पार्किंगचा मोठा भाग व्यापला असून वाहतूक खात्याकडे यावर कोणतेही नियंत्रण नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली.



पणजी, ताळगाव आणि सांताक्रूझ परिसरातील पर्यटक टॅक्सी व्यावसायिकांनी पवर आधारित कॅब सेवा आणि वाहनांच्या बेकायदेशीर गर्दीबाबत तक्रार घेऊन मोन्सेरात यांची भेट घेतली. यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना मोन्सेरात म्हणाले, पाटो किंवा बसस्थानक परिसरात पाहिले तर पार्किंगची किमान १० टक्के जागा या भाडे वाहनांनी व्यापलेली असते. इतर वाहनधारकांवर अन्याय होतो, आणि तरीही वाहतूक खाते डोळे झाकून बसले आहे. संचालक काय करतात, हेच कळत नाही.

त्यांनी सांगितले की, मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय उपस्थित केल्यानंतर नव्या रेंट-ए-कार व बाईक परवान्यांना स्थगिती देण्यात आली होती. परंतु तरीही या वाहनांचा उपद्रव सुरूच आहे. किनारी भागांमध्ये एकेक व्यक्तीकडे १५ रेंट-ए-कार आणि ५० रेंट-ए-बाईक असतात. ही वाहने ठेवायची कुठे? ज्यांच्याकडे फक्त एक-दोन वाहने आहेत, असे सामान्य नागरिक यात भरडले जात आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मोन्सेरात यांनी या सेवा अपघातांचे प्रमाण वाढवणाऱ्या ठरत असल्याचे नमूद केले. तसेच पारंपरिक टॅक्सी चालकांनी बँकांकडून कर्ज घेऊन व्यवसाय सुरू केला असून फक्त दोन हप्ते थकले तरी वाहन जप्त केले जाते. या व्यवसायिकांना संरक्षण हवे आहे, परंतु वाहतूक खाते पूर्णपणे निष्क्रिय झाले आहे, असा आरोपही त्यांनी केला.

दुसरीकडे राज्य सरकारच्या नव्या 'गोवा वाहतूक ॲग्रीगेटर मार्गदर्शक धोरण २०२५' विरोधात राज्यभरातील पारंपरिक टॅक्सी चालकांनी सोमवारी जुंता हाऊस येथील वाहतूक संचालनालय कार्यालयासमोर धडक दिली. यावेळी २,००० हून अधिक टॅक्सी चालक व मालकांनी आपली लेखी हरकत नोंदवली. या धोरणाच्या विरोधात पुढील १५ दिवसांत आणखी हरकती येण्याची शक्यता आहे. टॅक्सी चालक संघटनांच्या म्हणण्यानुसार, सरकारने 'गोवा माईल्स' नंतर आता नव्या ॲप ॲग्रीगेटर धोरणाद्वारे गोव्याच्या टॅक्सी व्यवसायाचे खासगीकरण सुरू केले आहे. हा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

टॅक्सी चालक योगेश गोवेकर म्हणाले की, पारंपरिक टॅक्सी व्यवसाय संपविण्यासाठी सरकारकडून वारंवार प्रयत्न केले गेले आहेत. आधी 'गोवा माईल्स' आणले, आता ॲप आधारित बाहेरील कंपन्यांना येथे स्थान दिले जात आहे. हे आम्ही कदापिही मान्य करणार नाही. टॅक्सी संघटनांनी सोमवारी वाहतूक संचालनालयावर धडक दिली असताना ठिकाणी कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यापूर्वीच जमावबंदीचे आदेश जारी करण्यात आले होते. टॅक्सी चालकांनी सकाळी काही स्थानिक आमदारांची भेट घेऊन धोरणामुळे उद्भवणाऱ्या आर्थिक नुकसानीची माहिती दिली व त्यांच्या पाठिंब्याची अपेक्षा व्यक्त केली.

गोवा सरकारने २० मे २०२५ रोजी 'गोवा वाहतूक ॲग्रीगेटर मार्गदर्शक २०२५' जारी केली असून, या धोरणावरील हरकतींसाठी ३० दिवसांची मुदत दिली आहे. ती २० जून रोजी संपणार आहे. टॅक्सी चालकांनी या धोरणाला एकमताने विरोध दर्शवला असून, हे धोरण गोव्याबाहेरील खाजगी कंपन्यांना स्थानिक व्यवसायात प्रवेश देण्याचे माध्यम असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यामुळे स्थानिक पारंपरिक टॅक्सी आणि पायलट सेवा मोडीत निघण्याची भीती व्यक्त केली जात आहे.